दै. देशोन्नती दि. 10.10.25

# फायनान्सच्या व्यवस्थापकास लुटणारा आरोपी पोलिसांच्या ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** फायनान्समधील व्यवस्थापकास लुटून त्याच्याकडील नगदी रक्कम व व ईतर मुद्देमाल चोरून नेणाऱ्या चोरट्यास नांदेड ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून नगदी ९५ हजार ८५० रुपये, टॅब व बायोमेट्रिक मशीन असा एकूण १ लाख २२ हजार ८५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

भारत फायनान्स इन्क्लूजन लिमीटेडचा संघ मॅनेजर बचत गटाची वसुली करत असताना जवळ बॅगमध्ये असलेले नगदी ९५, हजार ८५० रुपये, २२ हजार रुपये किमतीचा टॅब व बायोमेट्रीक अंगठा लावण्याची मशीन असा एकुण १ लाख २२ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल सोबत बाळगुन बचत गटाची वसुली करत असताना जवार कॉलनी ईदगाह मैदानच्या बाजुस एका अज्ञात इसमाने त्यांच्या डोळ्यात मिरची पूड फेकुन पैशाची बॅग व इतर साहित्य जबरीने हिसकावून पळून गेले अशी फिर्याद दिल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार पोलीस निरीक्षक ओमकांत चिचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध् पथकातील पोलीस अधिकारी व अमलदार हे गुन्ह्यातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेत सहा तासात



शोध लावून आरोपी शेख सलमान शेख अन्वर रा. खुदबेनगर यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून पोलिसानी नगदी ९५ हजार ८५० रुपये, टॅब व बायोमेट्रीक मशीन असा एकुण १ एकूण २२ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाई पथकात पोउपनि व्यंकट कुसमे, अंमलदार अर्जुन मुंडे, सत्तार शेख, गजेंद्र सिरमलवार, वैशाली घोनशेटवाड यांचा समावेश होता.